८. कोवळी पाने आल्यानंतर ब्रोमोपॉल २५० पी.पी.एम. (२५ ग्रॅम प्रति लिटर पाणी) किंवा बोर्डोमिश्रण ०.५ % किंवा कॅप्टान ०.२५ टक्के(२.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी) फवारणी करावी.

९. पानांवर व फळावर रोगांचा प्रादुर्भाव दिसत असेल तर, फवारणी चालू ठेवावी अन्यथा ३० दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.

१०. शेवटी पुन्हा एकदा ०.५ % बोर्डो मिश्रण + चिलेटेड झिंक ०.४ ग्रॅम/ लि. या प्रमाणात फवारणी करावी.

११. सदर औषधांची फवारणी फळ काढणीच्या १० दिवसा पूर्वी बंद करावी. पावसाळी हंगामात ही फवारणी फळ काढणी पूर्वी २० दिवस आधी बंद करावी. .

१२. तसेच पानांची वाढ होत असतांना कॅल्शिअम नायट्रेट, सिलीकॉन, आणि ०:५२:३४ या विद्राव्य खतांची ५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात ५ ते ६ दिवसांनी आलटून पालटून फवारण्या कराव्यात.

१३. सदर खतांची फवारणी रोगग्रस्त बागेमध्ये कमी प्रमाणात ठेवून जमिनीद्वारे खते देण्याचा प्रयत्न ठेवावा.



प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.१०३६/२०१५

**प्रकाशक**

डॉ.किरण कोकाटे

संचालक, विस्तार शिक्षण,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**संपादक**

डॉ.मिलिंद अहिरे

कार्यक्रम समन्वयक
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

**सह-संपादक**

डॉ.गोरक्ष ससाणे

प्रभारी अधिकारी/प्राध्यापक,
विस्तार शिक्षण, म.फु.कृ.वि., राहुरी

म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.१०३६/२०१५

# डाळींबावरील तेलकट डाग रोगाचे व्यवस्थापन




**लेखक**

डॉ. पंकज पाटील
विषय विशेषज्ञ (पीक सरंक्षण)

श्री. रोहीत कडू
विषय विशेषज्ञ (उद्यान विद्या)

डॉ. प्रविण राठोड
विषय विशेषज्ञ (मृदशास्त्र व कृषि रसायन)

भाकृअनुप
ICAR

महात्मा फुले कृषि विद्यापीठ

कृषि विज्ञान केंद्र, धुळे व
कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) धुळे

दुरध्वनी क्र.(०२५६२)२३०३६२

संकेतस्थळः http://www.kvkdhule.freeservers.com,
*E-mail* :pckvkdhule@rediffmail.com

# सामूहिक पध्दतीने तेल्या रोगाचे व्यवस्थापन

धुळे जिल्हयात डाळिंब पिकाखालील क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. डाळिंब पिकाखालील क्षेत्र १२७८० हेक्टर इतके आहे. या पिकावर समस्या देखील वाढलेल्या निदर्शनात येत आहेत. कृषी विज्ञान केंद्राकडे शेतकरी अशा रोग /किडी/ फुल व फळ गळ इ. समस्यांविषयी वेळोवेळी विचारणा करत असतात. सद्यस्थितीत डाळिंबावर मुख्य समस्या म्हणजे 'तेलकट डाग' म्हणजेच जिवाणूजन्य करपा हा रोग, अनेक उपाय करून देखील या रोगावर नियंत्रण मिळवणे डाळिंब उत्पादकांना शक्य होत नाही. या रोगाविषयी कृ.वि. केंद्राने सदरच्या घडीपत्रिकाद्वारे डाळींब उत्पादकांसाठी विस्तारीत केलेली माहिती निश्चित उपयुक्त ठरेल.

**तेल्या रोगाचा प्रसार -**

**प्राथमिक प्रादुर्भाव -** रोगग्रस्त झाडांवरील बांधलेल्या गुटी कलमाचा वापर, बागेशेजारी रोगग्रस्त फळे आणि झाडाचे रोगग्रस्त अवशेष टाकणे. बागेमध्ये अस्वच्छता असणे (तणांची अतिरिक्त वाढ व मुळ्यांच्या कक्षेतील दुर्लक्षित व्यवस्थापन) त्याचबरोबर झाडांच्या दाटीमुळे हवा खेळती नसणे व सूर्यप्रकाशाचा अभाव असणे.

**दुय्यम प्रादुर्भाव -**

रोगाचा प्राथमिक प्रादुर्भाव झाल्यानंतरच्या बागेत दुय्यम प्रसार हा वाऱ्याबरोबर आलेली रोगग्रस्त पाने, रोग ग्रस्त बागेतील मातीचे कण, वादळी पाऊस, औत-अवजारे, आंतरमशागत करतांना प्राणी तसेच मजुरांच्या हाताळणीमुळे, जमिनीवर वाहणारे पाणी, कीटक, इ. मुळे होतो.

**तेल्या रोगाच्या जीवाणूंची रूजवण व प्रसारास अनुकूल परिस्थिती-**

पावसाळी हवामानात रोगाचा प्रादुर्भाव अतिशय झपाट्याने होतो मध्यम स्वरूपात परंतु सातत्याने पडणारा पाऊसाच्या परिस्थितीमध्ये या रोगाच्या जीवाणूंची रूजवण होण्यास मदत होते. झाडाच्या पानांवरील पृष्ठभाग बराच काळ ओला राहिल्याने तेल्या रोगाच्या जीवाणूंची वाढ झपाट्याने होते. जमीन व झाडाच्या पर्ण सांभारामध्ये असलेला ओलावा व यामुळे बागेतील वाढलेली आद्रता या रोगाच्या प्रसारास मदत करते. रोगाच्या वाढीसाठी साधारणतः २५-३२ अंश सेल्सिअस तापमान व ३६ ते ८८ टक्के आद्रता फार पोषक ठरते.

**तेल्या रोगाचे जीवाणूंची आयुष्य मर्यादा -**

तेल्या रोगकारक जीवाणू हे ५० अंश सेल्सिअस तापमानापर्यंत जिवंत राहू शकतात. या रोगाचे जीवाणू वातावरणाच्या प्रतिकूल परिस्थिती २४० दिवसापर्यंत जीवंत राहतात. स्वच्छ व सुदृढ वाढ दिसणाऱ्या बागेत, नवीन बहर फुटल्यानंतर जोराचा मान्सूनपूर्व किंवा जानेवारी-फेब्रुवारी महिन्यातील पाऊसाच्या पोषक परिस्थितीत रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो.

**तेल्या रोगाचे व्यवस्थापन- छाटणी पुर्वी करावयाचे नियोजन -**

१. मागील बहाराची फळ काढणी झाल्यानंतर पुढील बहाराचे नियोजनापूर्वी बागेला ३-४ महिने विश्रांती देणे आवश्यक आहे. असे केल्याने झाडाची फळ काळातील झालेली झीज भरून निघण्यास मदत होते व झाड पुढील बहार साठीच्या शाश्वत फुल धरणे साठी सुदृढ होते.

२. फळकाढणी पूर्ण झाल्यानंतर बागेची स्वच्छता करावी. मागील हंगामातील रोग ग्रस्त फळे, फुले व फांदया (झाडावरील व जमिनीवर इतरत्र विखुरलेले) गोळा करावीत. झाडांची रोगग्रस्त अवशेष खड्डयात गाडून न टाकता किंवा इतरत्र न टाकता ते जाळून नष्ट करावेत.

३. बाग तणविरहित व स्वच्छ करावी.

४. झाडाच्या खोडावरील तसेच खालील बाजूकडून येणारे पानसोट फुटवे काढून टाकावेत.

५. विश्रांतीचे काळात जास्तीच्या पाण्याने अथवा पाऊस झाल्यास शेंडयाकडील भागापासून नवीन फूट येण्यास सुरू होते. अशी फूट ४-५ ठेवून खुडून घ्यावीत.

६. पुढील बहाराच्या खत व्यवस्थापनासाठी विश्रांतीचा काळ हा योग्य असतो. यासाठी बागेची मशागत करून दोन झाडांमधील जागेतून मातीचे नमुने घ्यावेत.

७. झाडांची प्रतिकार क्षमता वाढवण्यासाठी खत नियोजन करतांना सेंद्रिय खतांचा जास्तीत जास्त वापर करावा.

८. झाडाची प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी विश्रांतीच्या काळात कॅल्शिअम नायट्रेट, सिलिकॉन आणि ००:५२:३४ या विद्राव्य खतांची ५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात ५ ते ६ दिवसांनी आलटून पालटून ७ ते ८ फवारण्या कराव्यात.

९ .ब्रोमोपॉल ५०० पी.पी.एम + कॅप्टान ०.५ टक्के रोगाच्या तीव्रतेनुसार २-३ फवारण्या आवश्यक आहेत. (ब्रोमोपॉल ५० ग्रॅम + कॅप्टान ५०० ग्रॅम प्रति १०० लि. पाणी)

१०.विश्रांतीच्या काळात प्रकाश संश्लेषण क्रिया करणारे क्रियाशील भाग; पाने, कोवळी फुट, इ. रोग विरहित ठेवण्यासाठी डाळिंबावर येणारे इतर बुरशी रोगांसाठी प्रतिबंधात्मक फवारण्या सुरू ठेवाव्यात. इतर बुरशी जन्य रोगाच्या नियंत्रणासाठी करावयाचे व्यवस्थापन पुढे नमूद केले आहे.

**छाटणी झाल्यानंतर करावयाचे नियोजन -**

१. बहार धरणे अगोदर १५ दिवस आधी झाडाच्या आकारानुसार ६ इंच खोल जमिनीची चाळणी करून घ्यावी व झाडांची मुळे १५ दिवस सुर्यप्रकाशात उघडी करून ठेवावीत.

२. बहार धरण्यापूर्वी बागेची संपूर्ण पानगळ करून घ्यावी. म.फु.कृ.वि. राहुरीने पानगळ करण्यासाठी इथरेल १-२ मि.ली.प्रती लीटर पानी या संजीवकाची शिफारस केली आहे.

३. तेल्या रोगाच्या प्रसारास झाडांची गर्दी, खेळत्या हवेचा तसेच सूर्यप्रकाशाचा अभाव ही कारणे देखील कारणीभूत ठरत असल्याने, बागेची छाटणी करते वेळेस या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे.

४. झाडाच्या फांद्या प्रादुर्भाव झालेल्या भागाच्या २ इंच खाली छाटून नष्ट कराव्यात.

५. छाटणी झाल्यानंतर बागेची स्वच्छता करावी. छाटणी केलेली झाडावरील खाली पडलेली रोगट फळे, फुले व फांदया गोळा करावीत व खड्डयात गाडून न टाकता, जाळून नष्ट करावीत.

६. झाडाच्या खोडाला निमऑईल + ब्रोमोपॉल ५०० पी.पी.एम. (५० ग्रॅम प्रति १०० लिटर पाणी) + कॅप्टान ०.५ टक्के (५ ग्रॅम प्रति लिटर पाणी ) मुलामा दयावा.

७. पानगळ व छाटणीनंतर ब्रोमोपॉल ५०० पी.पी.एम. (५० ग्रॅम प्रति १०० लिटर पाणी) + कॅप्टान ०.५ टक्के (५ ग्रॅम प्रति लिटर पाणी ) जमिनीवर व झाडावर दाट फवारावे.